नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक १६/०५/२०२१ (रविवार)

---

# अवैधरित्या रेती चोरी करुन वाहतुक करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेकडुन कारवाई कारवाई रु.४०,४०,०००/— चा मुद्येमाल जप्त

वरिष्ठ अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे लॉक—डाऊन दरम्यान अवैध धंदयांवर कारवाई करिता दिनांक १५/०५/२०२१ रात्री दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेतील एक पथक रामटेक उप विभागात पेट्रोलिंग करित असता मिळालेल्या गुप्त बातमीवरुन अवैध चोरटी रेती वाहतुकीवर धाड टाकण्यासाठी खात येथील बोरगाव फाटा चौक येथे नाकाबंदी करित असतांना दिनांक १६/०५/२०२१ चे सकाळी ०५.०० वा. दरम्यान दोन टिप्पर १) एम.एच. ३६ एए २४७९ २) एम.एच.३६ ३४७९ हे रेतीने भरलेले वाहतुक करतांना दिसुन आले. दोन्ही टिप्पर यांना थांबवुन वाहन चालक तुळशीदास वंसता शेंडे वय २९ वर्ष रा. पचखेडी, (दवडीपार बाजार) ता.जि. भंडारा व लोकेश बळीरामजी मारवाडे वय ३१ वर्ष रा. मु.पो. चांदोरी ता.जि. भंडारा यांना गौण खनिज (रेती) वाहतुकीचा परवाना (टि.पी.) बाबत पथकाकडून विचारणा करण्यात आली असता त्यांनी कोणतेही परवाने उपलब्ध करु दिले नाही व सदरचा माल हे आपल्या मालक मिथुन विजय नागदिवे वय ३३ वर्ष रा. वार्ड नं. ०२ वरठी यांचे निर्देशावरुन रोहा बेताळा जि. भंडारा वरुन भरुन वाहतुक करिता असल्याचे सांगीतले. वरुन टिप्पर **१) एम.एच.३६ एए २४७९ २) एम.एच.३६ ३४७९, नमुद दोन्ही टिप्पर मध्ये भरलेली १० ब्रास रेती व दोन टिप्पर असा एकुण कि. ४०,४०,०००/— चा मुद्येमाल** जप्त करुन टिप्पर चालक व त्यांचे मालकाविरुध्द पो.स्टे. अरोली येथे अप क्रमांक ६२/२०२१ कलम ३७९,१०९ भादवि चा गुन्हा नोंद करुन आरोपी व मुद्येमाल पो.स्टे. अरोली यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा श्री.अनिल जिट्टावर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेतील पोउपनि श्री. सचिन मत्ते, पोहवा ज्ञानेश्वर राऊत, पोशि अमोल वाघ,विपीन गायधने व चापोना अमोल कुथे यांचे पथकाने केली.

## —: चोरी (रेती) :—

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत १ किमी अंतरावरील बायपास रोड येथे दिनांक १५/०५/२०२१ रोजी दर. पोलीस स्टेशन उमरेड चे पथक शासकीय वाहनाने पेट्रोलिंग करित असतांना ०४/३० ते ०४/५० वा. चे दरम्यान अशोक लेलॅंड कंपनीचा – टिप्पर क्र. एम एच.४९ ए.टि. – ०९९३ डाला १० चाकी मधे चालक महेद्र भोलानाथ वय ३८ रा चांपा व वाहक संदीप अभिमन्यू फोंडे वय ३५ रा चांपा हे क्षमतेपेक्षा जास्त ०३ ब्रास रेती किंमती २०,००० रू चा मुद्येमाल नितीन भाउराव बनकर वय ४० वर्ष रा वकिलपेठ नागपुर. यांच्या साहयाने भरून चोरून घेवून जात असतांना वाहतूक करतांना मीळुन आले. **टिप्पर क्र. एम एच.४९ ए.टि. – ०९९३ किंमती १५,३०,००० रू क्षमतेपेक्षा जास्त ०३ ब्रास चोरीची रेती किंमती २०,००० रू चा माल असा एकुण १५,५०,००० रू चा माल जप्त करण्यात आला.**

सदर प्रकरणी फिर्यादी पेशि/५४८ ग्यानिवंत गूरपुडे पो स्टे उमरेड मो.न. ९५५२५३१००२ चे लेखी रिपोर्ट वरुन त आरोपी १) महेद्र भोलानाथ वय ३८ रा चांपा २) संदीप अभिमन्यू फोंडे वय ३५ रा चांपा ३) नितीन भाउराव बनकर वय ४० वर्ष रा वकिलपेठ नागपुर.चे विरुध्द पो.स्टे. उमरेड येथे कलम ३७९,१०९.३४ भा.दं.वि.चा गुन्हा करण्यात आला असून पुढील तपास पोनि यशवंत सोलसे पो स्टे उमरेड मो.न.७०३८०४६३९९ हे करीत आहेत.

## —: जबरी चोरी :—

**पो.स्टे. उमरेड :—** अंतर्गत १० किमी अंतरावरील मौजा उदासा वेलसाखरा शिवारात १५/०५/२०२१ रोजी सैजाद खॉन कादर खॉन वय ३२ वर्ष रा. ताजबाग दिघोरी चौक आदर्या नगर एनआयटि ग्राउंड जवळ प्लॉट न. ११४ नागपूर हे आपल्या मीत्राचे गावी मौजा वेलसाखरा येथे आपले मोसा क्र. एम एच ४९ एयु. ५६२५ येथे आपल्या पत्नी सोबत जात असता उदासा वेलसाखरा शिवारातील अंदाजन १५/०० ते १५/३० वा दर.नाल्याजवळ ०३ अनोळखी ईसमांनी काळया रंगाच्या मो.सायकल वर ट्रीपल सीट येवून याला व तिच्या पत्नीला कोणत्यातरी धारधार वस्तुने वार करून पत्नी पत्नीची हॅन्ड बॅग जबरीने हिसकावून शिवीगाळ करुन पळून गेले हॅन्ड बॅग १)जुनी वापरती सोन्याची मंचली ०७ पीस २.५०ग्रॅम किंमती ५००० रू, अंदाजे २) काळया मण्याची व सोन्याचे मणी असलेली मीनी मंगळसुत्र ०३ ग्रॅम किंमती ६,००० रू अंदाजे ३)सोन्याची बाली ०३ ग्रॅम किंमती ६,००० रू अंदाजे ४) गळयातील सोन्याचे हार १२ ग्रॅम किंमती २४,००० रू अंदाजे ५)रोक रक्कम २८,००० रू ६) ओप्पो कंपनीचा एफ १६ मोबाईल त्यामधे आयडीया कंपनीचा सीम नं. ७०५७७३४७५४ असलेला किंमती ७,००० रू असा एकुण ७६,००० रू चा मुद्येमाल जबरीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी सैजाद खॉन कादर खॉन वय ३२ वर्ष रा. ताजबाग दिघोरी चौक आदर्या नगर एनआयटि ग्राउंड जवळ प्लॉट न. ११४ नागपूर चे तांडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. उमरेड येथे कलम ३९४,५०४,३४ **भा.दं.वि.** चा गुन्हा करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि राजु डोर्लीकर पो स्टे उमरेड मो.न.७५८८२३७७६४ हे करीत असून स्थानिक गुन्हे शाखेकडून सुध्दा आरोपीचा शोध घेणे सुरु आहे.

## —: चोरी :—

**पो.स्टे. मौदा :—** अंतर्गत टेकेपार चिरव्हा पुनर्वसन परिसरातील मधुबन हॉटेल मौदा समोर शासकीय इमारतीचे बांधकाम सुरू निमार्णधिन साइड वर ठेवलेले **१) प्लास्टो कंपनीचे पांढ—या रंगाचे ५०० लीटर चे २ टॅंक एकुण किमती ३००० /—रु २) प्लास्टो कंपनीचे १००० लीटर चे ३ टॅंक एकुण किमती ६००० /—रु ३) स्टिलच्या नळाला लावलेल्या तोटया किमती १०००—/रु असा एकुण १०,०००—/रु चा माल** अज्ञात आरोपीने नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी निलेष षेशरावजी मंगरे वय ३१ रा. प्लॉट नं.१२९ उत्थान नगर गोरेवाडा रोड नागपुर ( बांधकामाचे साईड इंचार्ज) चे तोडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. मौदा येथे कलम ३७९ भादवी चा गुन्हा करण्यात आला असून पुढील तपास सफौ ठाकुर मो. ७०८३१५१९९३ हे करीत आहे.

## —: चोरी ( मोटार सायकल ) :—

**पो.स्टे. काटोल :—** अंतर्गत काटोल शहर येथील तार बाजार येथे दिनांक १३/०५/२०२१ रोजी घनश्याम पुंडलिकराव तांदळे वय ४२ वर्ष जात तेली रा रेवतकर ले आउट काटोल हा आपली **मोटार सायकल हिरो होन्डा स्प्लेंडर प्लस क्र एम—एच—४० एम —९२९०** स्टॅडवर उभी करुन कामावर आला व दुपारी परत घरी जाण्याकरिता गाडीजवळ आला असता तेथे त्याला त्याची **मोटार सायकल दिसली नाही. ईतरत्र शोध घेतला मिळुन आली नाही सदरची मोटार सायकल कोणतील** अज्ञात इसमाने चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी घनश्याम पुंडलिकराव तांदळे वय ४२ वर्ष जात तेली रा रेवतकर ले आउट काटोल चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. काटोल येथे कलम ३७९ भादवी चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास नापोका संतोष आंधळे मो.नं. ८३८०८३३४२४ हे करीत आहे.

## —: चोरी ( मोटार सायकल ) :—

**पो.स्टे. सावनेर :—** फिर्यादी राहूल मनोहर जुमडे वय ३० वर्ष रा.वार्ड क्र ४ पाटणसावंगी ता.सावनेर हा पाटणसावंगी परिसरात सल्समॅन चे जॉब करून परत येत असता पाटणसावंगी बस स्टॉप जवळील न्यूनराही कुठी धाबा समोर रोडच्या कडेला आपली **ॲक्टीवा मोपेड ६ जी, गाडी क्र. एमएच—४९ डीएन ००७५** उभी करून पाणी पीण्याकरिता गेला परत आल्यावर गाडी दिसली नाही. कोणीतरी अज्ञात इसमानी` चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी राहूल मनोहर जुमडे वय ३० वर्ष रा.वार्ड क्र ४ पाटणसावंगी ता.सावनेर चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे कलम ३७९ भादवी चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ हिम्मत राठोड मो.नं.९६२३७ ८७८५४ हे करीत आहे.

## —:चोरी (जनावर) :—

**पो.स्टे. केळवद :—** अंतर्गत जोगा शिवार १७ कि मी जोगा शिवार येथील निवासी आशिष मनोहर वाडी वय २५ वर्षे रा.जोगा माळेगाव ता. सावनेर यांचे गावाला लागून असलेल्या गोठयामधून दिनांक १५/०५/२०२१ रोजी ०२/०० ते ०४/०० दर एक पांढ—या रंगाचा गोरा कि. ३०,००० रू दुसरा लहान गोरा कि. १०,००० रू व एक गाय पांढ—या रंगाची कि. १०,००० रू असा एकुण कि. ५०,००० रू चे जनावरे अज्ञात इसमांनी चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी आशिष मनोहर वाडी वय २५ वर्षे रा.जोगा माळेगाव ता. सावनेर चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. केळवद येथे कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद करण्यात असून पुढील तपास पोहवा रामराव पवार मो.क्र. ७८७५९ ८३३६० हे करीत आहे.

## —: जबरी संभोग :—

पो.स्टे. खापरखेडा — पोलीस स्टेशनला येवून फिर्यादी यांनी आपली तोंडी रिपोर्ट नोंदविली की ती निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणुन सन २०१९ मध्ये नागपूर येथील हास्पीटल मध्ये कार्यरत असतांना सुथादिरा पुन्नोस्वामी बालन वय ३५ वर्षे रा. ४३, मेन रोड, थोनन गुडी, सेल्लुर, कारायकल, पॉन्डीचेरी (सध्या कार्यरत आयुक्त, आयकर विभाग, बंगलोर) हा उपचाराकरीता हॉस्पीटल येथे आला असता, उपचारा दरम्यान तो एन.ए.डी.टी. प्रशिक्षणार्थी असल्याने त्याचे कडुन फिर्यादीस युपीएससीचे मार्गदर्शन घेणे असल्याने यातील आरोपीने फिर्यादीला आपला मोबाईल नंबर देवुन व फिर्यादीचा नंबर घेवुन जवळीक साधली. आरोपीने फिर्यादीस तो अविवाहित असल्याबाबत व त्यास फिर्यादी पंसत असल्याचे सांगुन फिर्यादीला लग्नाचे आमीष दाखवुन तिचे सोबत वारंवार सनराईज हॉटेल ॲन्ड रेस्टॉरेंट, दहेगाव रंगारी येथे लैंगीक संबंध ठेवुन तिचे शोषण करून त्या दरम्यान तिचे नग्न व्हिडीयो, फोटोग्राफ घेतले. त्यादरम्यान यातील फियादी ही त्याचे पासुन गरोदर राहिली. आरोपीने फिर्यादीस धमकी देवुन गर्भपात करण्यास भाग पाडले. तसेच तक्रार दिल्यास फिर्यादीचे त्याचे जवळ असलेले तिचे नग्न फोटोग्राफस व व्हिडीओ व्हॉयरल करण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी सुथादिरा पुन्नोस्वामी बालन वय ३५ वर्षे रा. ४३, मेन रोड, थोनन गुडी, सेल्लुर, कारायकल, पॉन्डीचेरी (सध्या कार्यरत आयुक्त, आयकर विभाग, बंगलोर) चे विरुध्द पो.स्टे. खापरखेडा येथे कलम ३७६(२), एन भा.दं.वि. भादवी गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक भटकर मो.क्र. ८६९८३ ३४९४१ हे करीत आहे.

## —: अपघात :—

पो.स्टे. पारशिवनी — अंतर्गत १६ किमी अंतरावरील आवळेघाट शिवरात गरीबदास वाघमारे याचे शेताजवळ रोडवर दिनांक १५/०५/२०२१ चे १८/३० वा. दर. गजानन घनश्याम शेंद्रे वय ३० वर्ष रा. तिष्टी हा आपली मोटार सायकल सी.डी. डिलक्स मो.सा. क्र एम.एच. ४०.बी.यु. ९२४७ हि आवळेघाट कडुन टेकाडीकडे

दारू पिवुन अतिशय वेगात व निष्काळजीपणे चालवीत नेत असता हेमराज हरीचंदजी निसार वय ४५ रा. आवळेघाट यास धडक दिल्याने ते त्यांचे तोंडाला गंभीर मार लागल्याने मरण पावले तसेच त्यांचे एक बैल सुध्दा जखमी झाला यात गजानन घनश्याम शेंद्रे सुध्दा जख्मी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी ज्ञानेश्वर विठोबाजी निसार वय ३५ रा. आवळेघाट ता. पारशिवनी चे तोंडी रिपोर्ट व वैद्यकीय रिपोर्ट वरुन आरोपी गजानन घनश्याम शेंद्रे वय ३० वर्ष रा. तिष्टी चे विरुध्द पो.स्टे. पारशिवनी येथे कलम २७९, ३३७, ३०४ (अ), ४२९ भा.दं.वि. गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक भटकर मो.क्र. ८६९८३ ३४९४१ हे करीत आहे.

## —: अवैध जनावर वाहतुक :—

पो.स्टे. उमरेड — अंतर्गत १ किमी अंतरावरील बयपास चौक रेल्वे क्रॉसींग उमरेड येथ दिनांक १५/०५/२०२१ चे सकाळी ०५/०० ते ०५/३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन उमरेड चे पेट्रोलिंग पथकानी महिंद्रा बोलेरो पिकअप गाडी क्र. एम एच.३६ एफ. २७८५ ला थांबवून चेंकीग केली असता त्यामध्ये अवैधरीत्या काळया रंगाचे लहान मोठे ७ हेले किंमती ५२,००० रू जनावरांना वाहनात कोबूंन क्रुर व निदयतेने त्यांचे शिंगे पाय दोराने बांधुन कोंबुन त्यांना निदयतेची वागणूक देउन वाहतूक करून घेवून जातांना महिंद्रा बोलेरो पिकअप चा चालक रोशन ताराचंद लिचडे वय ३२ वर्ष रा. कोंडा ता पवनी जि. भंडारा. मिळुन आला, **महिंद्रा बोलेरो पिकअप गाडी क्र.. एम एच.३६ एफ.२७८५ किंमती ५,५०,००० रू ७ हेले किंमती ५२,००० रू असा एकुण ६,०२,०००/—** चा मुद्येमाल जप्त करुन जनावरांना कत्तली पासून बचाव करण्यात आले.

सदर कारवाई पोलीस स्टेशन उमरेड चे पोलीस निरीक्षक यंशवंत सोलसे, पोहवा अरुण जयसिंगपुरे, पोना अरविंद चव्हाण, पोशि ग्यानीवंत गुरपपुडे व गोवर्धन सहारे यांनी पार पाडली आरोपी रोशन ताराचंद लिचडे वय ३२ वर्ष रा. कोंडा ता पवनी जि. भंडारा चे विरुध्द पो.स्टे. उमरेड येथे कलम ११(१),(घ),(ड),(च) प्रा.नि.वा.प्र. अधि.१९६०,सहकलम ५ (अ),(ए),९ म.प्रा.सं.अधि. सहकलम १८४,१३०/१७७ मोवाका. गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा अरूण जयसिंगपुरे पो स्टे उमरेड मो.न. ९०४९१ ७५४८५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर